# प्रेसनोट दि. ०३/०४/२०२३

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडील वाहतुक शाखेमार्फत दिनांक २४/०३/२०२३ ते ३१/०३/२०२३ दरम्यान राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात चाकण, भोसरी, तळेगाव हि औद्योगिक क्षेत्रे तसेच हिंजवडी, तळवडे, चिखली ही आयटी पार्क क्षेत्रे आहेत. सदर क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या नागरीकांची संख्याही मोठी असुन त्यांचेमार्फत दुचाकी व चारचाकी वाहनांचा वापर हा मोठ्या प्रमाणात होत आहे. नागरीक आपले ताब्यातील वाहन चालविताना रस्त्याचे नियमांकडे दुर्लक्ष करुन रॉंग साईडने तसेच ट्रिपल सिट वाहन चालवुन स्वत:चे तसेच इतरांचे जिवीतास धोका उत्पन्न करत असल्याने अपघातांच्या संख्येत वाढ होवुन दिवसेंदिवस गंभीर व किरकोळ स्वरुपाचे अपघात होत आहेत. सदर अपघातामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत तसेच वित्तहानी होत असल्याने त्यास प्रतिबंध करण्याकरीता पिंपरी चिंचवड वाहतुक शाखा कटीबद्ध आहे.

मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांचे आदेशाने सह पोलीस आयुक्त मनोज लोहिया सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री संजय शिंदे सो तसेच पोलीस उपायुक्त काकासाहेब डोळे सो, विवेक पाटील सो. यांचे मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेमार्फत दिनांक २४/०३/२०२३ ते ३१/०३/२०२३ दरम्यान रॉंग साईड तसेच ट्रिपल सिट वाहन चालविणारे वाहन चालकांविरुद्ध विशेष मोहिम राबविण्यात आली होती.

सदर मोहिमेदरम्यान रॉंग साईडने वाहन चालविणारे ३१३ वाहनचालकांवर तसेच ट्रिपल सिट वाहन चालविणारे १५८ वाहनचालकांवर भादंविस कलम २७९ प्रमाणे एकुण ४७१ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

तरी यापुढे अशाच प्रकारच्या वेगवेगळ्या हेडखाली वाहतुक विभागामार्फत कडक कारवाई करुन मा. न्यायालयात खटले/गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याने नागरीकांनी त्यांचेवर होणारी न्यायालयीन कार्यवाही टाळावी असे अवाहन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामार्फत करण्यात येत आहे.

(सतिश माने)
सहा.पोलीस आयुक्त,
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड शहर

Scanned with CamScanner